म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना. वा.
दा. क्र. २३८४

२३८४

दा. क्र. २३८४

# वे आंगके
# ठौक

IRBK-0102384
IRBK-0102384

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बाल-वाङमय
वा. नं. १०१

विषय बाल
१



# आंग कै पेंग

IRBK-0102384
IRBK-0102384

चित्रशाळा प्रेस ★★ प्रकाशन विभाग पुणें-२

# चिआंग-कै-शेक

( चरित्र )

म. ग्रं. सं. ठाणें.

पुनर्मुद्रण १९४६

--मुद्रक व प्रकाशक--
ग. त्र्यंबक जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ,
पुणें शहर.

म. ग्रं. सं. ठाणे,
२३८४ नों दि

किंमत ५ आणे

# प्रस्तावना

आजच्या चीनचा कर्णधार, चिनी सैन्याचा सरसेनापति व जगांतील एक थोर राष्ट्रपुरुष म्हणून जनरल चिआंग–कै–शेक यांचें नांव जगभर प्रख्यात झालें आहे. जपानच्या साम्राज्यशाही आक्रमणाला निधड्या छातीनें तोंड देत तो आपल्या पराक्रमाची शर्थ करीत आहे. अशा वेळीं त्याचें जीवनचरित्र मराठी वाचकांना माहीत असणें जरूर असल्यामुळें विविध सामुग्रीच्या आधारें हें छोटें पुस्तक मुद्दाम तयार केलें आहे. या पुस्तकावरून मराठी वाचकांना चिआंगचा थोडक्यांत पण यथार्थ परिचय होईल अशी आशा वाटते.

# चिआंग-कै-शेक

"'जेव्हां प्रसंग येईल तेव्हां देशासाठीं आत्मयज्ञ करावयाचा मीं निर्धार केलेला आहे. डॉ. सन्यत्सेनचा अनुयायी या नात्यानें त्या थोर पुरुषाला कमीपणा येईल असें वर्तन कदापिही माझ्या हातून होणार नाहीं; देशाला माझ्याबद्दल शरम वाटेल असें कृत्य माझ्या हातून कालत्रयींही घडणार नाहीं. चीनमध्यें क्रांति घडवून आणण्यासाठीं ज्या अर्थीं माझा जन्म झालेला आहे त्या अर्थीं क्रांतीसाठींच माझा देह खर्चीं पडणार आणि त्याबद्दल मला यत्किंचितही वाईट वाटत नाहीं."

—जनरल चिआंग-कै-शेक

चिआंग-कै-शेक हा मूळचा एका खेडवळ व्यापाऱ्याचा मुलगा, पण तो आज चीनचा सर्वसत्ताधारी झाला आहे. चीनचें भवितव्य आज त्याच्या हातांत आहे. त्याची लष्करी शिस्त भयंकर कडक आहे. त्याच्या इतका शिस्तीच्या धारेवर धरणारा सरसेनापति विरळा. तथापि पुष्कळदां

त्यानें आपल्या कट्टया शत्रूंनाही क्षमा करून त्यांना दया दाखविली आहे. हजारों वर्षेंपर्यंत जो चीन छिन्नविच्छिन्न झालेला होता त्या चीनचें एकीकरण करण्याचें बरेंचसें श्रेय त्याच्याकडेच आहे, असें म्हटल्यास हरकत नाहीं. मात्र हें एकीकरण घडवून आणण्यासाठीं त्याला अनेकदां आपल्या स्वदेशबांधवांबरोबर झगडावें लागलें आहे. चीन-मधील ही यादवी जवळजवळ दहा वर्षें चालूं होती. अखेर चिआंगचें नेतृत्व सर्वमान्य ठरलें. स्टॉलिन व मुसोलिनी यांच्या बरोबरीनें चिआंगचें महत्त्व आहे. या सर्वाधिकाऱ्यांतच त्याची गणना होते यांत शंका नाहीं. तथापि रणभूमीवर विजया-मागून विजय संपादन करणारा सरसेनापति म्हणून चिआंगची जेवढी ख्याति आहे तितकी राजकारणी, मुत्सद्दी म्हणून नाहीं. आणि त्याचमुळें स्टॉलिन, हिटलर, मुसोलिनी यांच्या प्रभावळींत त्याला विशेषसें महत्त्वाचें स्थान देतां येत नाहीं.

प्रखर राष्ट्राभिमान त्याच्या नसानसांतून वहात असला तरी त्याच्यावरचे हे राष्ट्रीयत्वाचे संस्कार

जपानमध्यें झाले आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याचें बहुतेक सर्व शिक्षण जपानमधील विद्यापीठांतून झालें असून तो धर्मानें ख्रिस्तानुयायी आहे. चीनमध्यें प्रचलित असलेला कान्फ्यूशस अगर बौद्धधर्म यांचा त्यानें त्याग केलेला आहे, हें पाहून पुष्कळांना आश्चर्य वाटतें. वास्तविक पहातां त्यानें धर्मांतर केलेलें असलें तरी प्राचीन चिनी संस्कृतीचे त्याच्यावर इतके जबरदस्त संस्कार झालेले आहेत कीं, त्याच्या ख्रिस्तानुयायित्वाची कल्पनाही येत नाहीं. धर्म हा नुसता बाह्य वेष आहे, पण संस्कृतीचीं बीजें अंतरंगापर्यंत पोंचलेलीं असतात.

चिआंग–कै–शेक सर्वसामान्य चिनी माणसापेक्षां उंचीनें अधिक आहे. त्याची उंची पांच फूट दहा इंच आहे. लष्करी वृत्ति जरी त्याच्या अंतरंगांत भिनलेली आहे व सरसेनापति म्हणूनच सर्व जग जरी त्याला ओळखतें तरी त्याची शरीरयष्टि लष्करी पेशाला शोभण्यासारखी नाहीं. तो शरीरप्रकृतीनें नाजुक दिसतो, कणखरपणा नांवालाही आढळत

नाहीं. पण त्याचें चापल्य वाखाणण्यासारखें आहे. चिआंगचें आजचें वय ५२ असून वजन १४१ पौंड आहे. त्याच्या सगळ्या अवयवांत त्याचे डोळे



चिआंग-कै-शेक व मादाम चिआंग

सर्वांत आकर्षक आहेत. काळेभोर, तीक्ष्ण, तेजस्वी व भेदक असें त्याच्या डोळ्यांचें वर्णन करतां येईल.

चिआंगला सकाळीं खूप लवकर उठण्याची संवय आहे. बहुतकरून तो पहाटेस उठतो व तेव्हांपासून जों कामाला लागतो तों अगदीं संध्याकाळ होऊन दिवे लागेपर्यंत. तो अतिशय दीर्घोद्योगी आहे. सबंध दिवस कुठल्या ना कुठल्या कार्यांत तो व्यग्र असतो. पहाटेपासून सकाळच्या उपाहारापर्यंतचा वेळ म्हणजे दिवसांतील अत्यंत मौल्यवान् व महत्त्वाचा वेळ आहे असें तो समजतो व त्या अवधींत जितकें महत्त्वाचें काम उरकतां येईल तितकें उरकण्याची तो कोशीस करतो. कोचावर पडल्या पडल्या कामें करण्याची नेहमींची संवय आहे. दुपारचें जेवण झाल्यावर तो जुन्या फोनोग्राफवर ‘ आव्हा मेरिया ’ हें आपलें आवडीचें रेकॉर्ड लावतो व त्या संगीताच्या नादांत त्याची वामकुक्षी सुरू होते. फोनोचा आवाज बंद झाला कीं, निद्रादेवीनें त्याच्यावर आपला अंमल बसवला आहे असें निश्चित समजावें. कारण मधुर आवाजाच्या तंद्रींत त्याला तेव्हांच झोंप लागते. तास अर्धा तास वामकुक्षी झाल्यावर तो परत कामाला लागतो, पण पुन्हां चार

वाजतां काम बंद करतो. कारण ही वेळ त्याची प्रार्थनेची असते. मनन, चिंतन अगर प्रार्थना यांसाठीं साधारणपणें त्याला अर्धा तास लागतो. तो बराच धार्मिक व भाविक आहे.

त्याला कोणत्याही प्रकारचें व्यसन नाहीं. त्याच्या-इतका निर्व्यसनी सर्वाधिकारी बहुतेक आढळणारच नाहीं. तो दारूला शिवत नाहीं, तंबाखूपासून अलिप्त आहे, इतकेंच नव्हे तर चहा-कॉफीसारखीं साधीं पेयेंही तो शक्य तितकीं टाळतो.

चिआंगला टापटिपीची व व्यवस्थितपणाची अतिशय आवड आहे. प्रत्येक गोष्ट पद्धतशीर व्हावी अशी त्याची नेहेमीं इच्छा असते व त्याप्रमाणें तो वागत असतो. दररोज न चुकतां रोजनिशी लिहिण्याची त्याची फार जुनी पद्धत आहे. तो या रोजनिशींत त्या दिवशीं घडलेल्या सर्व महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख करीत असतो. त्याच्या या रोजनिशीमुळेंच एकदां त्याचा जीव बचावला असेंही म्हणावयास हरकत नाहीं. १९३६ च्या

डिसेंबरांत त्याच्या जपानविषयींच्या धोरणामुळें असंतुष्ट झालेल्या चँगसुए–लियांगच्या कम्युनिस्ट टोळीनें जेव्हां त्याला पळवून नेलें होतें त्या वेळीं त्याच्या झडतींत त्यांना त्याची डायरी सांपडली होती. या डायरींत चिआंगनें आपल्या पत्नीला पाठविलेलीं कांहीं पत्रें होतीं. चँगसुएनें चिआंगच्या डायरीसुद्धां सर्व पत्रें वाचलीं व त्यावरून जनरल चिआंगबद्दल त्याचा अत्यंत अनुकूल ग्रह झाला. लागलींच जनरलची मुक्तता करण्यांत आली हें सांगणें नकोच.

चिआंग हा मनोवृत्तीनें व स्वभावानें सैनिक असला तरी तो काव्यप्रिय आहे. त्याच्या जीवनांत अत्यंत आवडीच्या गोष्टी अशा तीन आहेत. काव्य, गिरिविहार व त्याची पत्नी मादाम चिआंग. द्ऱ्याखोऱ्यांत भटकणें किंवा उंच डोंगरावर सहल करणें अगर दुपारच्या उन्हांत दाट जंगलांत फिरत रहाणें या गोष्टी त्याला फार आवडतात, पण नेहमीं कांहींना कांहीं महत्त्वाचे उद्योग पाठीमागें असल्यामुळें त्याला वनविहाराचा फारसा आस्वाद घेतां येत नाहीं. तो जेव्हां एकटाच जंगलांत भटकत

असतो त्या वेळीं काव्यांतल्या ओळी गुणगुणण्याचा त्याला नाद आहे. प्राचीन चिनी काव्यवाङ्मयाचा तो विशेष भोक्ता असून त्याचें किती तरी पाठांतर झालेलें आहे.

चिआंगचें सांसारिक जीवन अत्यंत सुखी आहे. मादाम चिआंग-कै-शेक ही त्याला नेहमीं जवळ असावीशी वाटते. कारण तिचें सान्निध्य ही त्याच्या सांसारिक व राजकीय यशस्वितेची गुरुकिल्ली आहे. राजकारणांत सल्लागार व सहकारी या दृष्टीनें तिचा त्याला मोठा आधार वाटत असला तरी पत्नी म्हणून तर तो तिला पूज्य देवताच समजतो. मादामचें शिक्षण अमेरिकेंत झालें असल्यामुळें परराष्ट्रीय वकिलांशीं चर्चा करतांना तिचा विशेष उपयोग होतो. मादामच्या खालोखाल डब्ल्यू. एच्. डोनाल्ड व डॉ. जॉर्ज शेपर्ड हे दोघे त्याचे सल्लागार म्हणून समजले जातात. डोनाल्ड हा ऑस्ट्रेलियांतील वृत्तपत्रकार असून डॉ. शेपर्ड अमेरिकन मिशनरी आहे.

चिआंगला एकांतवास मनापासून प्रिय असल्या-मुळें तो शक्य तितका सार्वजनिक जीवनापासून

अलिप्त रहातो. तो थोडासा भावनाप्रधानही आहे. निरनिराळ्या प्रांतांत दौऱ्यावर असतांना त्याला मेजवान्यांच्या परतभेटी द्याव्या लागतात, तथापि त्या वेळीं सुद्धां तो अगदीं जितक्यास तितकेंच वागतो. १९३८ च्या मार्च महिन्यांत चीनला जेव्हां एक अपूर्व विजय मिळाला तेव्हां त्याचा जयजयकार करण्यासाठीं प्रचंड जनसमुदाय त्याच्या घरासमोर जमला होता. त्या वेळीं त्यांच्या अभिनंदनाचा स्वीकार करण्यासाठीं सुद्धां तो बाहेर आला नाहीं. अखेर त्याच्या सल्लागारांच्या विनंतीवरून त्यानें जनतेच्या अभिवादनाचा स्वीकार केला आणि तो सुद्धां मोठ्या नाइलाजानें. सर्वसामान्य जनतेंत मिसळणें, तिच्याशीं एकरूप होणें हें त्याला जमतच नाहीं. त्याला तें मनापासून नको असतें.

मात्र जनरलला जेव्हां परकीय पाहुणे, वृत्तपत्रकार अगर परराष्ट्रीय मुत्सद्दी यांना भेटण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं तो अधिक मिळूनमिसळून वागतो. अशा भेटीच्या वेळीं मादाम चिआंग ही दुभाष्याचें काम करते. जनरलला जपानीशिवाय दुसरी

कोणतीहि परकीय भाषा येत नसल्यामुळें परक्या लोकांशीं बोलण्याचालण्याचें काम मादामलाच करावें लागतें. त्याला अलीकडे थोडें इंग्रजी समजूं लागलें आहे. परराष्ट्रीय वकिलाबरोबर राजकीय वाटाघाटी करण्याचा प्रसंग उद्भवला तरी त्याच्या वतीनें बोलणें करण्याचें काम मादामच करते. तो नुसता हजर असतो. मादामला त्याच्या राजकीय धोरणांतल्या सर्व खांचाखोंचा पूर्ण माहीत असल्यामुळें त्याला अधून मधून तिला सूचना द्याव्या लागत नाहींत. ती बोलतांना जणूं त्याचें मनच तिच्या द्वारें बोलत आहे अशा भावनेनेंच परकीय मुत्सद्यांशीं बोलत असते. चिआंगला प्रत्येक गोष्ट झटपट व थोडक्यांत आटपण्याची संवय असल्यामुळें तो कुणाबरोबर तास न् तास बोलत बसत नाहीं. अमेरिकन अगर युरोपियन वृत्तपत्रांचे बातमीदार त्याच्या विस्तृत मुलाखतीसाठीं घुटमळत असले तरी दहापांच मिनिटांतच तो त्यांना निरोप देईल. त्याचा कामाचा उरक दांडगा आहे.

मुसोलिनीप्रमाणें चिआंगचेंही अत्यंत कडेकोट रीतीनें संरक्षण केलें जातें. पुष्कळदां तो ज्या

म. ग्रं. सं. ठाणे.

मोटारींतून जातो त्या मोटारीला एक इंच जाडीच्या भक्कम कांचा बसविलेल्या असतात व सशस्त्र शरीर-रक्षकांचा त्याच्या भोंवतीं कडक पहारा असतो. तथापि कधीं कधीं सर्वसामान्य जनसमुदायांत सामान्य नागरिकाप्रमाणें मिसळण्यासही तो कमी करीत नाहीं. अगदीं यःकश्चित् माणसाप्रमाणें रहदारीच्या रस्त्यांतून तो पुष्कळदां पायींच हिंडत असतो. या वेळीं त्याच्या भोंवतीं त्याचे शरीरसंरक्षक नसतात. आणि असले तरी ते २०० फूट लांब असतात.

चिआंगला आवडीचा अगर मनोविनोदनाचा असा कोणताच छंद नाहीं. खेळापेक्षां वाचनांत त्याचें मन अधिक रमतें. वाचन ही त्याची एकमेव करमणूक आहे. प्राचीन चिनी वाङ्मयांतील कान्फ्यूशसचीं नीतिवचनें त्याचीं अत्यंत आवडतीं आहेत. विशेषतः कान्फ्यूशसचें पुढील वचन त्यानें आपल्यापुढें आदर्श म्हणून ठेवलें आहे.

" ज्याला देशावर अधिकार चालवावयाचा असेल त्यानें प्रथम आपल्या कुटुंबावर अधिकार चालवला पाहिजे.

ज्याला कुटुंबावर अधिकार चालवावयाचा असेल त्यानें नैतिक शिक्षणानें आपल्या देहावर अधिकार चालवायला पाहिजे.

ज्याला देहाचें नियमन करावयाचें त्यानें प्रथम मनाचें नियमन केलें पाहिजे.

ज्याला मनाचें नियमन करणें असेल त्याचे हेतु शुद्ध असावयास हवेत.

ज्याला आपल्या मनांतील हेतु शुद्ध असावेत असें वाटतें त्यानें आपलें ज्ञान वाढवलें पाहिजे."

* * * *

चिआंगचा जन्म इ. स. १८८७ सालीं चिको या खेड्यांत झाला. हें खेडेगांव चेकिआंग प्रांतांतील फेंगुआ जिल्ह्यांत आहे. त्याचें घराणें कांहीं मोठेसें श्रीमंत नव्हतें. तसेंच तें अगदीं गरीबही नव्हतें. त्याच्या वडिलांची परिस्थिति मध्यमवर्गीयांत मोडण्यासारखी होती. त्याला लहानपणींच शाळेंत घालण्यांत आलें. शाळेंतल्या अभ्यासांत त्यानें कधींच वरचा नंबर मिळविला नाहीं. तथापि कर्तव्यदक्ष म्हणून त्याची ख्याति होती. वयाच्या विसाव्या वर्षीं म्हणजे १९०७ सालीं त्यानें आपला नेहमींचा शिक्षणक्रम सोडून दिला व पेकिंगजवळ असलेल्या पाओटिंग लष्करी विद्यालयांत आपलें नांव दाखल केलें. तेथील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर तो जपानांत गेला व तेथील सुप्रसिद्ध शिंबो गोक्यो नांवाच्या

लष्करी अधिकाऱ्यांच्या कॉलेजांत त्याला प्रवेश मिळाला. कॉलेजांतून बाहेर पडल्याबरोबर जपानी लष्कर खात्यानें त्याची ताबडतोब सैन्यांत नेमणूक केली. चिआंग हा जवळ जवळ चार वर्षे जपानी सरकारचा नोकर होता.

जपानमध्यें असतांनाच १९०९ सालीं चीनच्या क्रांतीचा जनक डॉ. सन्यत्सेन याच्याशीं त्याची गांठ पडली. त्या वेळीं चिआंगचें वय अवघें २२ वर्षांचें होतें. डॉ. सन्यत्सेन निर्वासितावस्थेंत जपानमध्यें रहात असतांना त्यानें चिनी तरुणांच्या मनांत देशभक्तीचीं बीजें पेरण्यास सुरुवात केली. त्याच्या भोंवतालच्या तरुणांपैकीं ज्यांच्या हृदयांत राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित झाली त्यांत चिआंगचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. त्यानंतर चिआंग जपानमध्यें दोन वर्षें राहिला. तथापि 'टंगमेंघुई' नांवाच्या गुप्त संस्थेचा तो सभासद झाला. ही संस्था चिनी राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करण्यासाठीं स्थापन झाली होती. ज्वलज्जहाल देशभक्तांनीं चीनच्या विमोचनार्थ या गुप्त संस्थेच्या द्वारें प्रयत्न चालविले होते. चीनमध्यें त्यानंतर कोमिंटांग नांवाचा जो प्रबळ राष्ट्रीय पक्ष

स्थापन झाला त्याचीं बीजें या संस्थेंतच आढळून येतात. १९११ सालीं चीनमध्यें मांचू राजघराण्याची सत्ता उलथून पाडून चिनी लोकशाहीची जेव्हां प्रतिष्ठापना करण्यांत आली तेव्हां चीनमधील क्रांतीच्या रणयज्ञांत स्वतःची आहुति देण्यासाठीं चिआंगनें मागचा पुढचा विचार न करतां जपानचा किनारा सोडून चीनमध्यें तांतडीनें प्रयाण केलें. वास्तविक चिआंगचें हें कृत्य उघड उघड बेकायदेशीर होतें. जपानी लष्करांतून पळून जाण्याचा त्यानें हा भयंकर गुन्हा केला होता, पण राष्ट्रभक्तीनें त्याचें हृदय इतकें प्रज्वलित झालें होतें कीं, असले विचार करण्यास त्याला अवसर नव्हता. चीनमध्यें आल्याबरोबर त्यानें आपला लष्करी पोषाख व तरवार आगबोटीनें जपानला पाठवून दिली ! चिआंगचें हें कृत्य म्हणजे जपानी लष्करी शिस्तीचा उघड उघड उपमर्द होता !

१९११ ते १९१६ या पांच वर्षांच्या अवधींत चीनमध्यें क्रांतीची जी रणधुमाळी चालली होती तिच्यांत त्याला पुष्कळसें लढावें लागलें. लहान-

सहान यादवी युद्धांत स्वदेशबांधवांविरुद्ध तरवार गाजवून क्रांतीचें कार्य यशस्वी करण्यासाठीं त्याचीं हीं पांच वर्षें गेलीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सन्यत्सेनचा उजवा हात म्हणून चिआंगनें त्याचा जसा विश्वास संपादन केला त्याप्रमाणें त्यानें जनतेकडूनही नांवलौकिक मिळविला. उत्तरोत्तर त्याची कीर्ति वृद्धिंगतच होत गेली. पण एकाएकीं १९१७ सालीं चिआंगच्या डोक्यांत काय आलें कोण जाणें. त्यानें आपल्या पक्षाचा व सैन्याचा राजीनामा दिला. कांहीं तरी उद्योगधंदा करून खूप पैसा मिळविल्याशिवाय आपलें राजकारण यशस्वी होणें शक्य नाहीं. असें त्याच्या मनानें घेतलें व ताबडतोब त्या दृष्टीनें त्यानें तिकडे आपला मोर्चा वळविला. त्यानें प्रथम एका व्यापारी फर्ममध्यें साध्या कारकुनाची नोकरी धरली व हळूं हळूं सर्व व्यापारी धोरणें आत्मसात् करून त्यानें आपलें महत्त्व फर्मच्या भागीदारांना उत्कृष्ट रीतीनें पटवून दिलें. त्याची बुद्धिमत्ता व व्यापारी डोकें पाहून थोड्याच दिवसांत दोघां धनाढ्य भांडवलवाल्यांनीं त्याला आपल्या पातींत

घेतलें. अशा प्रकारें चार वर्षांत चिआंगची बड्या व्यापाऱ्यांत गणना होऊं लागली.



जनरल चिआंग

सन १९२१ सालीं चिआंगनें पुन्हां राजकारणांत प्रवेश केला. तो पूर्वीसारखाच एका लष्करी तुकडीचा अधिपति झाला व क्रांतीच्या पुढारीपणाचीं कांहीं सूत्रें त्याला आपल्या हातीं घ्यावीं लागलीं.

१९२३ सालीं सन्यत्सेननें त्याला मॉस्कोला पाठविलें व तो तेथें सहा महिने राहिला. या

अवधींत त्याला एक बरीच महत्त्वाची कामगिरी करावयाची होती. रशियाकडून शस्त्रास्त्रें मिळवून तीं सन्यत्सेनकडे पाठविण्याचें कार्य त्याच्यावर सोंपविण्यांत आलें होतें. तें त्यानें अत्यंत कुशलतेनें पार पाडलें. मॉस्कोमध्यें असतांना च्यिआंगनें ट्रॉटस्की प्रभृति मोठमोठ्या रशियन मुत्सद्यांच्या गांठीभेटी घेतल्या व त्यांच्याशीं विचारविनिमय केला. १९२५ सालीं कोमिंटांग पक्षाच्या कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष म्हणून त्याची सर्वानुमतें निवड झाली व डॉ. सन्यत्सेनच्या मृत्यूनंतर राष्ट्रीय सैन्याचा सर-सेनापति म्हणून त्यानें सर्व लष्करी सूत्रें आपल्या हातीं घेतलीं व तो चिनी राष्ट्रीय पक्षाचा सर्वश्रेष्ठ अधिकारी झाला.

चिआंगनें आपल्या कारकीर्दीला १९२६ सालीं मोठ्या धाडसानें सुरवात केली. त्यानें एक अपूर्व पराक्रम करावयाचें ठरविलें. आपल्या लष्करी सत्तेच्या सामर्थ्यावर त्यानें चीनचें एकीकरण घडवून आण-ण्याचें अत्यंत दुर्घट, प्रचंड व अमर्याद असें कार्य हातीं घेतलें. यावेळीं कोमिंटांग पक्षानें चीनच्या

फक्त दक्षिण भागांत आपली सत्ता प्रस्थापित केली असल्यामुळें बाकीच्या प्रदेशांत त्यांचें म्हणण्यासारखें अस्तित्वही नव्हतें. ' पुंडाई करणाऱ्या मूठभर कम्युनिस्ट गुंडांची टोळी ' अशी शांघायमध्यें या राष्ट्रीय पक्षाची संभावना होत असे व चिआंगला ' बुरख्यांतील बोल्शेव्हिक ' अशी पदवी बहाल करण्यांत आली होती. चिआंगच्या सैन्यानें ठिकठिकाणीं जे पराक्रम केले त्यायोगें जिकडे तिकडे लोक आश्चर्यचकित होऊन गेले होते, यांत शंका नाहीं. देशांत यावेळीं लांचलुचपत, बेशिस्तपणा, गुंडगिरी, अनाचार, स्वार्थ, इत्यादि दुर्गुणांचा नुसता बुजबुजाट झाला होता. मोठमोठे जमीनदार स्वतःजवळ पुष्कळ सैन्य बाळगून प्रबळ झाले होते. ते एकमेकांचा नाच करण्यासाठीं आपापसांत भांडत होते. अशा सर्वस्वीं बिकट व प्रतिकूल परिस्थितींत चिआंगला चीनचें एकीकरण घडून आणावयाचें होतें. त्यानें आपलें स्वतःचें सर्व सैन्य एकत्रित केलें व संघटित रीतीनें इतरांशीं टक्कर देण्याचा चंग बांधला. तो स्वतः रणांगणावर उतरला. त्याला आपल्याजवळच्या

द्रव्याचाही या कामीं विनियोग करावा लागला. त्याच्या सैन्यानें पहिल्या प्रथम वुचांगवर स्वारी केली व १९२६ च्या आक्टोबरमध्यें तें सर केलें. हँ-चौ फेब्रुवारी १९२७, शांघाय व नानकिंग मार्च १९२७ व पेपिंग जुलै १९२८ त्याप्रमाणें चिआंगनें चीनचे प्रमुख प्रांत व प्रमुख शहरें जिंकून आपली सत्ता बऱ्याच मोठ्या प्रदेशावर प्रस्थापित केली. चिआंगचा हा विजय म्हणजे चीनच्या इतिहासांतील एक अपूर्व घटनाच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. चिआंगनें अस्ताव्यस्त पसरलेल्या व छिन्नविच्छिन्न झालेल्या चीनला पद्धतशीर व आटोपशीर स्वरूप दिलें. चीन हा एके काळीं प्रचंड भूप्रदेश म्हणून ओळखला जात असे. त्याला चिआंगनें संघटित राष्ट्राचें स्वरूप दिलें.

सन १९२१ मध्यें डॉ० सन्यत्सेननें चीनच्या उद्धारासाठीं तीन सिद्धान्त मांडून ठेवले होते. राष्ट्रीयत्वाची भावना, लोकशाही व स्वावलंबन या तीन गोष्टी जर अंमलांत आल्या तर चीनचा भविष्यकाळ उज्ज्वल झाल्याशिवाय रहाणार नाहीं

अशी त्याची श्रद्धा होती. चिआंगनें डॉ० सन्च्या या तत्त्वांच्या अनुरोधानें आपल्या कार्यक्रमाला प्रारंभ केला.

चिआंगच्या यशस्वितेचें मुख्य मर्म कशांत असेल तर तें त्याच्या पोलादी निश्चयशक्तींत व कणखरपणांत आहे. त्याची चिकाटीही दांडगी आहे. शिकारी कुत्र्याप्रमाणें त्याची मनोवृत्ति आहे. एकाद्या गोष्टीचा इतका पिच्छा पुरवावयाचा कीं, ती पुरती हातीं आल्याखेरीज स्वस्थ बसावयाचें नाहीं हें त्याचें धोरण आहे. चिआंग हा उच्च दर्जाचा थोर सेनापति असला तरी त्याच्याजवळ मुत्सद्दीगिरी नाहीं. कूट कारस्थानें रचण्यांत व गुप्त कारवाया करण्यांत त्याचें डोकें चालत नाहीं. त्याचा सगळा कारभार उघडाउघड व मर्दानी रोकठोकपणाचा आहे.

चिआंग हा मनानें उमदा असला तरी एकंदरीनें क्रूर व निर्दय आहे. त्याच्या सैन्यांतली शिस्त इतकी कडक आहे कीं, जे लोक त्याचे हुकूम मानायला तयार होत नाहींत त्यांना तो बेधडक

 म. ग्रं. सं. ठाणें.

फांशी देतो. अगदीं क्षुल्लक व किरकोळ कारणावरून त्यानें कितीतरी सैनिकांना व अधिकाऱ्यांना ठार मारलें आहे. चिआंगनें जनतेवर व सैन्यावर जरब बसविण्यासाठीं आजपर्यंत हजारों लोकांना यमसदनीं पाठविलें असेल. कम्युनिस्टांना उखडून काढण्या-साठीं तो ज्या ज्या मार्गांचा अवलंब करतो ते मार्ग अत्यंत कठोर व क्रूर असतात. कम्युनिस्टांना नेस्तनाबूद करण्यासाठीं त्यानें अनेकदां त्यांच्या क़त्तली केल्या आहेत. आपलें मोहरें कसें पुढें सरकवावें व आपली सत्ता दृढमूल कशी करावी या बाबतींत तो मोठा धूर्त आहे. दुसऱ्याचें कपट ओळखण्याची धूर्तता त्याच्याजवळ आहे. चिआंगचा सर्वांत मोठा अभिनंदनीय गुणविशेष कोणता असेल तर त्याचें असामान्य धैर्य. कोणताही, कसलाही बांका प्रसंग येवो तो यत्किंचितही डगमगत नाहीं अलोट धैर्याचा तो पुतळा आहे, असें म्हटलें तरी चालेल. त्याचें नीतिधैर्यही वाखाणण्यासारखें आहे.

चिआंगला स्वतःच्या निर्णयाची इतकी खात्री असते कीं, आपल्या सहकाऱ्यांच्या चुका त्यांना

२३८४

पटवून देण्यांत तो कालक्षेप करीत बसत नाहीं. त्यांच्या त्यांनाच जेव्हां त्यांच्या चुका कळून येतात तेव्हां ते आपण होऊनच त्याच्याकडे जाऊन पश्चात्ताप व्यक्त करतात व त्याची माफी मागतात. चिआंगला पुष्कळ वेळां असा अनुभव आला असल्यामुळें तो आपल्या निश्चयापासून रतिभरही ढळत नाहीं. चिआंगच्या या वृत्तीमुळें त्यानें पुष्कळदां शत्रूंचे मित्र केले आहेत व हे मित्र पुढें त्याचे सहाय्यकर्ते बनले आहेत.

चिआंगचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्याची सहनशीलता. जपाननें चीनवर आक्रमण केलें, मांचूरिया गिळंकृत केला, जेहोल खाल्ला, आंतर-मंगोलियाच्या स्वाहाकाराची दहशत घातली तरी चिआंगनें जपानविरुद्ध प्रतिकाराचें बोटही उचललें नाहीं. जपानचें हें आक्रमण, हा धसमुसळेपणा चिआंग अगदीं उघड्या डोळ्यानें पहात होता. इतकेंच नव्हे तर ज्या चिनी लोकांनीं जपानला प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला त्यांना चिआंगनें शिक्षा ठोठावली. चिआंगची ही तटस्थ निर्विकार

वृत्ति त्याच्या सहकाऱ्यांनाही पसंत पडली नाहीं व त्यांनीं त्याचा पुष्कळ निषेध केला; पण च्यिआंगच्या वृत्तींत पालट पडला नाहीं. सध्यां जपानबरोबर युद्ध करणें चीनच्या दृष्टीनें उपयुक्त होणार नाहीं, उलट त्यांत चीनचाच घात होईल, असें च्यिआंगचें ठाम मत असल्यामुळें त्यानें मुळींच हालचाल केली नाहीं. अखेर १९३७ सालीं त्यानें युद्धाचें रणशिंग फुंकलें. इतके दिवस त्यानें गुप्त रीतीनें तयारी करण्यांत घालविले.

प्रत्यक्ष युद्धांत भाग घेऊन शौर्य प्रकट करणाऱ्या सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठीं च्यिआंगनें जीं बक्षिसें ठेवलीं आहेत त्यामुळें त्याच्याबद्दल सैनिकांना आदर वाटतो. लढाईंत क्षात्रतेज प्रकट करणाऱ्यांना सर्वत्र सन्मानदर्शक हुद्दे देण्यांत येतात; पण च्यिआंग द्रव्यरूपानें पारितोषिकें देतो. प्रत्यक्ष युद्धांत लढणाऱ्या सैनिकाला जर जखम झाली तर त्याला प्रत्येक जखमेच्या मागें १५ रुपये देण्यांत येतात. वरच्या अधिकाऱ्यांना ५० पासून १५० रुपयांपर्यंत पारितोषिक मिळतें.

चिआंग–कै–शेक हा चीनचा सर्वाधिकारी व सरसेनापति असूनही त्याचा पगार महिना सुमारें १५०० रुपये आहे. त्याचें खाजगी उत्पन्न विशेषसें मोठें असेल असें वाटत नाहीं. कांहीं वर्षांपूर्वी शांघाय येथें असतांना त्यानें खूप पैसा मिळविला होता. मात्र त्याची दुसरी पत्नी मेलिंग सुंग ऊर्फ मादाम चिआंग–कै–शेक हिचें घराणें चीनमध्यें अत्यंत धनाढ्य म्हणून प्रसिद्ध आहे.



मेलिंग सुंग ऊर्फ मादाम चिआंग.

चिआंगचें पहिलें लग्न त्याच्या वयाच्या १५ व्या

वर्षी माओ नांवाच्या एका खेडवळ मुलीबरोबर झालें; पण १९२१ सालीं त्यांचा घटस्फोट झाल्यामुळें १९२७ सालीं दुसरें लग्न होईपर्यंत तो अविवाहितच राहिला. माओपासून त्याला चिंग-कु-ओ नांवाचा एक मुलगा झाला आहे. सध्यां हा मुलगा ३० वर्षांचा असेल. चिआंगनें जरी माओला सोडचिठ्ठी दिली तरी तो तिच्या पोषणाचा सर्व खर्च करतो. आई आणि मुलगा एकत्रच राहतात. मात्र चिआंग त्यांच्याकडे कधीं जात नाहीं; त्यांचा संबंध जणूं सुटल्यासारखा झाला आहे.

ता. १ डिसेंबर १९२७ रोजीं चिआंगचा मेलिंग या सुंग घराण्यांतलि सुशिक्षित मुलीशीं दुसरा विवाह झाला. हा विवाह प्रेमविवाह आहे. राजकीय कार्यामुळें परस्परांचा परिचय झाला व त्याचें पर्यवसान विवाहांत झालें. सुंग घराणें ख्रिस्तधर्मानुयायी असल्यामुळें मेलिंगशीं विवाह करावयाचा असेल तर चिआंगनें ख्रिस्ती झालें पाहिजे, अशी मेलिंगच्या थोरल्या बहिणीनें त्याला अट घातली. आपल्या प्रेमाखातर तो ख्रिस्ती व्हावयासही तयार झाला;

पण त्याच्यावर सक्ति करण्यांत आली नाहीं. तथापि लग्नानंतर त्यानें ख्रिस्ती धर्माचा अभ्यास केल्यावर त्याला त्या धर्माविषयीं आपुलकी वाटूं लागली. व ता. २३ आक्टोबर १९३० रोजीं त्यानें नव्या धर्मांत पदार्पण केलें.

मादाम–चिआंग ही जितकी सुंदर आहे तितकीच बुद्धिमान् आहे. अमेरिकेंत वेलस्ले विद्यापीठाची पदवी तिनें संपादन केली असून राज्यशास्त्राचा तिचा व्यासंग मुत्सद्यांनाही लाजविणारा आहे. प्रत्येक महत्त्वाच्या कामीं चिआंग तिचा सल्ला घेतल्याशिवाय पाऊल पुढें टाकीत नाहीं यावरून तिचें महत्त्व व तिची किंमत कळून आल्याखेरीज राहाणार नाहीं.

गेल्या २५०० वर्षांत चीनच्या इतिहासांत जे थोर राष्ट्रपुरुष होऊन गेले त्यांत डॉ. सन्यत्सेन यांच्या खालोखाल चिआंग-के-शैक यांची अवश्य गणना केली पाहिजे. जपानच्या विरुद्ध चीनचें अभेद्य एकीकरण करून चीनचा सर्वांगीण उत्कर्ष घडवून आणण्याची चिआंगची महत्त्वाकांक्षा आहे

व त्याप्रमाणें त्याचे भगीरथ प्रयत्न चालू आहेत. चिआंग हा चीनचा उद्धारक होणार नाहीं काय ?

१९३७ सालीं चँग सुए लिआंगच्या कम्युनिस्ट टोळीनें जेव्हां चिआंग-कै-शेकला पळवून नेलें होतें त्या वेळीं आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांत त्यानें पुस्तकाच्या सुरुवातीला दिलेले उद्गार काढून आपली राष्ट्रनिष्ठा, निधडेपणा व वीरवृत्ति प्रकट केली होती. जपानी साम्राज्यसत्तेबरोबर संगनमत करीत असल्याचा चिआंगवर त्यांचा आरोप होता. त्यासाठींच त्यांनीं त्याला अटक केली होती. अखेर चिआंगचा पत्रव्यवहार व त्याच्या जवळचे कागदपत्र जेव्हां त्यांनीं वाचले तेव्हां चिआंगच्या तेजस्वी राष्ट्रीयत्वाची त्यांना खात्री पटली व त्यांनीं त्याला परत सन्मानानें पोंचतें केलें. या कम्युनिस्टांची पहिल्याप्रथम अशी कल्पना होती कीं, चिआंगला जगांतून नाहींसा केल्याशिवाय चीनमध्यें युद्धाची खरी रणधुमाळी पेटणार नाहीं. आणि त्याप्रमाणें त्याचा शिरच्छेद करण्याचा बेत आंखण्यांत आला होता. चिआंगनें मादामला वर उल्लेख केलेलें जें पत्र पाठविलें होतें तें याच वेळीं

लिहिण्यांत आलें होतें. चिआंगवर आजपर्यंत अशीं अनेक संकटें आलीं असून सुदैवानें प्रत्येक वेळीं तो अक्षरशः शीरसलामत सुटला होता.

चिआंगचा दर सोमवारचा कार्यक्रम नेहमींपेक्षां विशेष व गंभीर स्वरूपाचा असतो. ज्या ठिकाणीं चिआंगचा व त्याच्या मंत्रिमंडळाचा मुक्काम असेल त्या ठिकाणीं सकाळच्या प्रहरीं पहिल्याप्रथम सहाशें सैनिकांची तुकडी सज्ज होऊन येते, बँड वाजूं लागतो व चिआंगसुद्धां सर्व लहान मोठे अधिकारी सन्यत्सेनच्या तसबिरीपुढें उभे राहतात व डोळे मिटून तीन वेळां त्या प्रतिमेला अभिवादन करतात. हा देखावा जितका उदात्त असतो तितकाच तो गंभीर व परिणामकारक असतो. अभिवादनाचा समारंभ झाल्यावर जनरल चिआंग डॉ. सन्यत्सेनच्या संदेशापैकीं एकेक वाक्य उच्चारतो व बाकीचे सर्वजण हळूं आवाजांत त्याचा पुनरुच्चार करतात. जणूं कांहीं प्रार्थनामंदिरांत सामुदायिक प्रार्थनाच चालली आहे अशा प्रकारचा हा कार्यक्रम असतो.

त्यानंतर जनरल चिआंग दोनतीन मिनिटें सर्वांना निःस्तब्ध रहावयास सांगतो व लागलींच

त्याचें व्याख्यान सुरूं होतें. हें व्याख्यान तास दीड तास चालतें व तें संपेपर्यंत सर्वांनीं उभें राहिलें पाहिजे असा शिरस्ता आहे. या भाषणांत तो जरूरीच्या व महत्त्वाच्या विषयांची चर्चा करतो. सध्यां राजकीय परिस्थिति काय आहे व लष्करानें कसें धोरण आंखावयास पाहिजे याबद्दलही विवेचन करतो. इतकेंच नव्हे तर अधिकाऱ्यांच्या चुका दाखवून त्यांना उपदेश करण्याचें कामही तो याच वेळीं उरकून घेतो. या सर्व साप्ताहिक कार्यक्रमाला सरकारी नोकरांशिवाय इतर बाहेरच्या लोकांना हजर राहण्याची परवानगी नसते.हा सगळा कार्यक्रम संपल्यावर तो जनसमुदायाचे आभारही मानीत नाहीं अगर त्यांना अभिवादनही करीत नाहीं. ‘खलास’ एवढा एकच शब्द उच्चारून तो एकदम निघून जातो.

सध्यां चीनवर जपानचें जें आक्रमण चालू आहे तें या वर्षाअखेर संपेल असा राजकीय तज्ज्ञांचा कयास आहे. वास्तविक जपाननें जाहीर रीतीनें चीनाविरुद्ध हें युद्ध पुकारलेलें नाहीं, तथापि जपाननें आपल्या सैन्यानिशीं चीनचा एक एक

भाग गिळंकृत करण्याचें जें धोरण चालविलें आहे त्याला जनरल चिआंग आपणांकडून शक्य तों प्रतिकार करीत आहे. पण जपानी शक्तीपुढें दुर्बळ चीन कितीसा तग धरूं शकणार ? जपाननें आतांपर्यंत चीन देशाच्या प्रदेशापैकीं ६,००,००० सहा लक्ष चौरस मैलांचा टापू आपल्या साम्राज्यास जोडला असून सध्यां तरी ह्यँकौपलीकडे पदक्षेप करावयाचा नाहीं असें जपाननें ठरवून टाकलें आहे. चिनी सैन्याचा सरसेनापति जनरल चिआंग यानें पश्चिम चीनमधील चुंकिंग ही आपली तात्पुरती राजधानी केली असून तेथेंच मुख्य लष्करी ठाणें ठेवण्यांत आलें आहे. ज्या कम्युनिस्टांना उखडून काढण्याचें चिआंगनें ठरविलें होतें त्याच कम्युनिस्टांच्या आठव्या तुकडीच्या साहाय्यानें त्यानें जपानबरोबर गनिमी काव्याची लढाई सुरू केली आहे.

१९३८ मध्यें त्यानें जपानबरोबर सलोख्याचा तह करावा म्हणून त्याच्याकडे अनेक सूचना व शिष्टमंडळें आलीं. पण प्रत्येक गोष्ट त्यानें धुडकावून लावली. अखेर चालू वर्षाच्या प्रारंभीं त्यानें

अखेरपर्यंत लढण्याचा आपला दृढ निश्चय जाहीर केला. पण यामुळें एके काळीं त्याच्याशीं एकनिष्ठ असलेले त्याचे निकटचे कित्येक अनुयायी त्याला सोडून गेले. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, जपानशीं सलोखा केल्यास चीनचा आज जो प्रदेश शिल्लक



चिआंग–लष्करी वेषांत

आहे तोही राहणार नाहीं. पण 'मारीन किंवा मरेन' या चिआंगच्या निर्धारापुढें कोणाचेंच कांहीं चाललें नाहीं. फेब्रुवारी महिन्यांत कोमिंटांग पक्षाची वार्षिक सभा भरली असतां तेथें चिआंग व कम्युनिस्ट गट यांच्यामध्यें दुफळी होण्याचा प्रसंग

उद्भवला होता; पण चीननें रशियाची मदत घ्यावयाचें ठरविल्यामुळें तो प्रसंग टळला. तेव्हां-पासून रशियाकडून चीनकडे शस्त्रास्त्रांची व सैनिकांची मदत एकसारखी येऊं लागली आहे. गेल्या वर्षांत चिनी सैन्यांत १३०० रशियन अधि-कारी पाठविण्यांत आले. तसेंच तोफा, दारूगोळा, विमानें, रणगाडे, लष्करी मोटारी इत्यादि जवळजवळ चार कोटी रुपयांचें युद्धसाहित्य रशियानें गेल्या वर्षीं चीनला पुरविलें. चीननें आपल्या लष्करी अधिकाऱ्यांना उच्च दर्जाचें शिक्षण देण्यासाठीं सुमारें ८०० चिनी अधिकारी रशियांत धाडण्यांत आले होते. १९३८ सालीं रशियानें चीनला जी मदत केली त्याच्या दुप्पट मदत १९३९ सालीं करण्यांत आली. यावरून रशिया चीनला आपल्या जाळ्यांत अडकविणार कीं काय असा संशय उत्पन्न झाला आहे. चिआंग–कै–शेक हा रशियाच्या हातचें बाहुलें बनणार काय ?

## मादाम चिआंगचें चरित्र.

चीनमध्यें अलीकडच्या काळांत सुंग घराण्यांतील

तिघी बहिणींनीं अलौकिक कामगिरी करून चीनच्या इतिहासांत आपलें नांव अमर करून ठेवलें आहे. राष्ट्रभक्ति, कर्तृत्व, बुद्धिमत्ता, राजकारण-पटुत्व इत्यादि गुणांच्या बाबतींत सुंग बहिणींनीं डॉ० सन्यत्सेन, चिआंग–कै–शेक, डॉ. कुंग, वेलिंग्टन कू, या थोर राष्ट्रपुरुषांच्या बरोबरीनें कीर्ति संपादन केली आहे. सर्वसामान्य चिनी स्त्री ही अशिक्षित, घरकामांत हुशार, पूर्वपरंपरागत संस्कृतींत वाढलेली व एकंदरीनें मागासलेली अशी असल्यामुळें या सुंग भगिनींनीं चीनमध्यें जें कर्तृत्व प्रकट केलें तें केव्हांही अपूर्व व असामान्यच होय यांत शंका नाहीं.

कँटन येथील एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या या तीन मुली असून त्या विसाव्या शतकाच्या प्रारंभीं पाश्चात्य शिक्षण घेण्यासाठीं अमेरिकेंत गेल्या. त्यांनीं जॉर्जिया व मॅसॅच्युसेट्स येथील विद्यापीठांत उच्च शिक्षण संपादन केलें. या तिघींपैकीं सर्वांत कनिष्ठ जी मे–लिंग ( म्हणजे आजची मादाम चिआंग-कै-शेक ) तिनें मॅसॅच्युसेट्स युनिव्हर्सिटींत मिळविलेलें पारितोषिक

मिळवून आपली असामान्य बुद्धिमत्ता प्रकट केली. पदवीधर होण्यापूर्वी हें बक्षीस मिळविणारी ही पहिलीच विद्यार्थिनी असल्यामुळें तिचें यश अद्वितीय ठरलें. दुसरी बहीण चिंगलिंग ही १९१२ च्या क्रांतीपूर्वी चीनमध्यें परत आली व कांहीं दिवस डॉ. सन्यत्सेनच्या सेक्रेटरीचें काम केल्यावर तिनें त्याच्याशीं विवाह केला. सर्वांत थोरली बहीण एलिंग ही चीनचे अर्थमंत्री डॉ. कुंग यांची धर्मपत्नी झाली. आपल्या धाकट्या बहिणींच्या मानानें एलिंग ही फारशी प्रसिद्ध नसली तरी डॉ. कुंग यांच्या प्रत्येक कामांत ती त्यांची महत्त्वाची सल्लागार आहे. डॉ. कुंग यांच्या अंदाजपत्रकांचा पहिला खर्डा तिच्याच हातचा असतो असें म्हणतात.

मादाम चिआंगनें चीनमध्यें आपलें नांव जें प्रस्थापित केलें तें स्वतःच्या कर्तृत्वशक्तीवर केलें आहे,–जनरलची पत्नी म्हणून नव्हे–हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. मादामचा जन्म १८९८ सालीं झाला. म्हणजे आज तिचें वय चाळीसच्या घरांत आहे. ती लहानपणींच अमेरिकेला गेली होती व

तिचें सर्व शिक्षण अमेरिकन वातावरणांत झाल्यामुळें तिच्यावर पाश्चात्य जीवनाचे जितके संस्कार झाले आहेत तितके तिच्या दोघी वडील बहिणींवर झालेले नाहींत. पदवीधर झाल्यावर ती जेव्हां अमेरिकेंतून परत आली तेव्हां तिच्या बहिणींनीं चीनच्या राजकारणांत महत्त्वाचें स्थान संपादन केलें होतें. १९२८ सालीं तिनें जनरल चिआंग-कै-शेकशीं विवाह केला, व तेव्हांपासून ती त्याच्या जीवनक्रमाशीं इतकी समरस व एकरूप झाली आहे कीं, तिच्याशिवाय त्याचें पान हलत नाहीं. त्याचीं भाषणें तयार करणें, त्याला मुद्दे काढून देणें, ज्या ठिकाणीं त्याला हजर राहतां येत नसेल त्या ठिकाणीं त्याच्या वतीनें हजर रहाणें व त्याचें काम पार पाडणें, त्याच्या मुलाखतीसाठीं येणाऱ्यांना मुलाखती व माहिती देणें, त्याचा कार्य-क्रम तयार करणें, इत्यादि प्रत्येक गोष्ट मादाम चिआंग करीत असते. चिआंगची खाजगी चिटणीस या नात्यानें मादामनें सर्व जबाबदारी स्वीकारली आहे. चीनच्या लेजिस्लेटिव्ह युआनमध्यें म्हणजे

चीनच्या पार्लमेंटांत सभासद म्हणून बसण्याचा पहिला मान मादाम चिआंगनें मिळविला आहे. ती मोटार चालविते, घोड्यावर बसते, इतकेंच नव्हे तर विमानोड्डाणही करते. कोणत्याही गोष्टींत ती मागें नाहीं. चीनच्या आधुनिक इतिहासांत इतकी सुसंस्कृत, सुविद्य व कर्तबगार स्त्री झालेली नाहीं. मादाम ही स्वभावतःच सौजन्यशील व मृदु अंतः-करणाची असल्यामुळें ती सर्वत्र लोकप्रिय आहे. सर्वसामान्य लोकांत मिसळून त्यांचीं सुखदुःखें समजून घेण्यांत व त्यांच्याशीं समरस होण्यांत तिला मुळींच कमीपणा वाटत नाहीं, उलट धन्यता वाटते. सौजन्य, सेवा, प्रामाणिकपणा व मनाची उदारता हीं चार तत्त्वें तिला आदर्शभूत वाटत असून राष्ट्राचा उद्धार व्हावयाचा असेल तर तीं प्रत्येकानें आपल्या जीवनांत आणलीं पाहिजेत असें तिचें म्हणणें आहे.

जनरल चिआंग–कै–शेक हे ज्याप्रमाणें लोक-सत्ताक चीनचे प्रमुख आहेत त्याप्रमाणें मादाम चिआंगला ‘ चीनची अनभिषिक्त सम्राज्ञी ’ असें

म्हणण्यास हरकत नाहीं. कारण तिनें आपल्या कर्तृत्वावर ती पदवी संपादन केली आहे.

मादाम चिआंगला आपल्या ख्रिस्ती धर्माविषयीं विशेष अभिमान व आत्मीयत्व वाटतें. इतकें कीं तिचें सगळें जीवन ख्रिस्ती धर्मांतील उदात्त तत्त्वांशीं जणूं काय एकरूप झालें आहे. तिच्या वागणुकींतील



मादाम चिआंग चिनी वेषांत.

सौजन्य, भूतदया, पतितांविषयींची सहानुभूति, दीनदुःखितांबद्दलचा जिव्हाळा, स्वधर्मीयांइतकीच परधर्मीयांबद्दलची आपुलकी, त्यागवृत्ति इत्यादि

गुण खऱ्या ख्रिश्चन धर्माचे द्योतक आहेत, असें एका अमेरिकन वृत्तपत्रानें म्हटलें आहे तें पूर्णपणें खरें आहे. ख्रिस्ती धर्मांतील उदात्तता मादाम चिआंगच्या अंगीं इतकी बाणलेली आहे कीं, ती चीनच्या सरसेनापतीची पत्नी असूनही बाँबच्या माऱ्यानें जखमी होऊन इस्पितळांत पडलेल्या रणशूर सैनिकांची सेवाशुश्रूषा करतांना स्वतःच्या जिवाकडेही पहात नाहीं. सबंध दिवसभर ती इस्पितळांतच असते, असें म्हटल्यास हरकत नाहीं. आणि हें भूतदयेचें कार्य संभाळून जनरल चिआंगच्या महत्त्वाच्या राजकीय कार्यक्रमांत भाग घेण्यास तिची तयारी असते. चीनमध्यें ‘ नवजीवना ’ ची जी नवी चळवळ सुरूं करण्यांत आली आहे तिच्या प्रचाराचें बरेंचसें श्रेय मादाम चिआंगला दिलें पाहिजे. सर्वसाधारण चिनी जनतेंत नवचैतन्य निर्माण करून राष्ट्रप्रेम, साधेपणा, स्वदेशीचा अभिमान, वीरवृत्ति इत्यादि गुणांचा विकास करण्यासाठीं मादामनें अत्यंत परिश्रम घेतले आहेत. आपल्या देशाच्या व देशबांधवांच्या उद्धारासाठीं

मादाम चिआंगनें जनरल चिआंगच्या बरोबरीनें आपलें आयुष्य वाहून घेतलें आहे यांत शंका नाहीं.

मादाम चिआंग ही जन्मानें चिनी असली तरी आधुनिक युरोपियन संस्कृतींत ती वाढली असल्या-मुळें तिची एकंदर वागणूक अमेरिकन स्त्रीसारखी आहे. ती जितकी धीट व मनमोकळी आहे तितकीच सौजन्यशील व भावनाप्रवण आहे. तिच्या स्वभावांतला साधेपणा कोणालाही आकर्षक वाटेल इतका उमदा आहे. सर्वसामान्य चिनी स्त्रियांपेक्षां मादाम चिआंग ही कितीतरी पटीनें स्वरूपसुंदर असून तिचे काळे डोळे विशेष मोहक आहेत. तिच्याशीं बोलतांना कोणालाही तिच्याबद्दल आदर वाटावा अशी तिच्या चेहऱ्यामोहऱ्यांत व वागण्या-सवरण्यांत कोणती जादू आहे कोण जाणे, पण प्रत्येकाला तिच्याविषयीं आदर वाटतो एवढी गोष्ट खरी.

आजकाल राजकारण हें मादामचें जीवन झालें असलें तरी राजकारणाचे क्षुद्र डावपेंच खेळणाऱ्यां-बद्दल तिला तिटकाराच वाटतो. कम्युनिस्टांविषयीं

तिचा चांगलासा ग्रह नाहीं. त्यांच्या हातून चीनचा उद्धार होणार नाहीं असें तिला वाटतें.

ती अतिशय उद्योगी आहे. सबंध दिवसभर कोणत्या ना कोणत्या कार्यांत ती निमग्न असते. चिआंग–कै–शेकची मुलाखत घेण्यासाठीं परराष्ट्रीय वृत्तपत्रांचे बातमीदार अगर परराष्ट्रीय राजप्रतिनिधि आलेले असोत अथवा जखमी सैनिकांच्या इस्पितळाला भेट देण्याचा प्रसंग येवो, दोन्हीहि ठिकाणीं ती सारख्याच तत्परतेनें पुढें येते. जनरल चिआंगला उत्तम इंग्रजी येत नसल्यामुळें हीं परराष्ट्रीय मुलाखतीचीं कामें तिलाच करावीं लागतात आणि ती मादाम चिआंग इतक्या कुशलतेनें बजावते कीं, त्यावरून तिच्या राजकारणपटुत्वाची यथार्थ कल्पना आल्याशिवाय रहात नाहीं.

आजच्या चीनचा जो राजकीय व सामाजिक इतिहास बनत आहे त्याचें बरेंचसें श्रेय जनरल चिआंग व त्याची पत्नी मादाम यांना दिलें पाहिजे. त्यांच्या हातून चीनचा पुनरुद्धार होईल अशी आशा बाळगावयाला यत्किंचितही हरकत नाहीं.

---

२३८४
बा. ना.